MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२२४ | सोमवार दि.०६ मे २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -224 | MONDAY DT. 06 MAY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4



लोकनेते पंकजाताई गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या प्रचारार्थ नित्रुड सर्कल मध्ये आज खोरी तांडा मास्तर तांडा आईनगर तांडा जाधव तांडा टकारवाडी येथे ऊसतोड मजुरांच्या भेटी घेऊन ताईसाहेबांना मतदान करण्याचे आहे व ताई साहेबांनी ऊसतोड मजुरांसाठी आतापर्यंत केलेले कामे सांगताना कृष्णा तिडके बंडूभाऊ राठोड दिनेश आव्हाड राजेभाऊ पवार श्रीराम पवार संतोष पवार उत्तम पवार देवदास आडे रामा वरपे जगन्नाथ जाधव अशोक बडे निवृत्ती राठोड शंकर पवार सरपंच गणपत पवार योगेश जाधव शरद पवार उपस्थित सर्व मुकदम

# आ.लक्ष्मण पवार माजीमंत्री बबनराव लोणीकर यांचा ताफा मराठा आंदोलकांनी आडवलं

## भाजपाच्या उपऱ्या नेत्याला पुन्हा गेवराई तालुक्यातून हाकलून दिले

सुमेध करडे /तलवाडा

**गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे बबनराव लोणीकर यांची कॉर्नर बैठक घेण्यात आली होती लगेच ते कार्यक्रम संपवून आंतरवाली येथे सभा आयोजित करण्यात आली होती आक्रमक मराठा समाजाने घोषणा देत बबनराव लोणीकर येण्या आधीच कार्यक्रम रद्द करण्यात आला करण्यात आला**

**बीड लोकसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार पंकजा मुंडे यांची तलवाडा सर्कल या ठिकाणी कॉर्नर बैठकीचे आयोजन आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांच्यामार्फत करण्यात आले होते तलवाडा या ठिकाणी संत भगवान बाबा मंगल कार्यालय कॉर्नर बैठक आंतरवाली या ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते तलवाडा पासून आंतरवाली चार ते पाच किलोमीटर असून त्या ठिकाणी जाण्या अगोदरच भाजप विरोधात गावकऱ्याचा रोष पाहून कार्यक्रम रद्द करण्यात आला आंतरवाली या ठिकाणी सर्व ग्रामस्थ जमा होऊन एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत भाजप विरोधात आपला रोष व्यक्त करत होते हा जमाव पांगवण्यासाठी तलवाडा पोलीस स्टेशन कर्मचारी तात्काळ त्या ठिकाणी आले व पोलिसांच्या गाडी समोरच मोठ मोठ्याने घोषणा देऊ लागले असा सोशल मीडियावर देखील व्हिडिओ व्हायरल होत असून तालुक्यामध्ये गावकऱ्यांनी सभा रद्द केल्यामुळे चर्चेला चांगलाच उधाण आले आहे**

ही घटना समजतात आमदार बबनराव लोणीकर गावात आलेच नाही त्यामुळे होणारा कार्यक्रम रद्द करण्यात आला.सध्याच्या राजकीय परिस्थिती पाहता महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून सरकार सहविरोधकांना खूप मोठा डोकेदुखीचा त्रास मराठा आंदोलन होत आहे मराठा आंदोलन आक्रमक होत असतानाच यावेळी फक्त मराठा समाजाच्याच नेत्यांनी निमित्त अठरापगड जातीने सध्याच्या राजकीय परिस्थितीत पाहतात थोडा पुढे राजकारण महाराष्ट्रामध्ये चालू आहेत परंतु याच राजकारणाला कंटाळून महाराष्ट्रातील जनता आता नवीन पर्याय शोधण्याच्या तयारीत आहे तर यावेळी महाराष्ट्रात मध्ये अनेक ठिकाणी आमदार मंत्री मुख्यमंत्री असतील किंवा कोणते पक्षाचा आजी–माजी मंत्री नेता कार्यकर्ता याला गावामध्ये आढळण्याचे काम या ठिकाणी संबंधित गावकऱ्यांकडून विचारणा होत आहे की मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना आम्ही येणाऱ्या निवडणुकीमध्ये पाडाव का नाही पण आम्हाला तुम्ही काय दिले गावासाठी तुम्ही काय केलं असाही प्रश्न यावेळी उमेदवाराला व त्यांच्या कार्यकर्त्याला नेत्यांना आमदार मंत्री या सर्वांना बीड जिल्हा महाराष्ट्रातील जनता ज्या त्या गावातील जिल्ह्यातील प्रभागातील वार्डातील जिल्हा परिषद गट पंचायत समिती गट अशा वेगवेगळ्या मतदार राजाकडून ऐकायला मिळत आहे परंतु यावेळी जरा जास्तच मराठा समाज हा विद्यमान भाजपाच्या सरकारवर चिडलेला दिसून येत आहे यामध्ये फडवणीस शिंदे व पवार यांचे तिहेरी सरकार असून या तीन चाकी सरकारच्या सर्वच नेत्यांनी विरोधामध्ये महाराष्ट्र मध्ये खूप मोठा लोकांचा रोज पाहायला मिळत आहे म्हणून मराठा आरक्षणाचा मुद्दा तापलेला असताना आज त्या परिस्थितीत मराठा आंदोलकांना जे योग्य वाटते तेच गावकऱ्यांना योग्य वाटते असाही यावेळी सल्ला गावकऱ्यांच्या वतीने संबंधित नेत्यांना देण्यात येत आहे तर गावकऱ्यांच्या वतीने आज गेवराई तालुक्याचे आमदार लक्ष्मण पवार यांनी माजी मंत्री बबनराव लोणीकर यांना सोबत घेऊन आज गेवराई तालुक्यांमध्ये दौरा आंतरवाली वावरी या गावांमध्ये करण्यासाठी गेले असताना रस्त्यात त्यांना अडवून त्यांच्या गाड्या त्या ठिकाणी परत पाठवल्या आहेत म्हणून आज सुद्धा बीड जिल्ह्यामध्ये कोपऱ्या नेत्यांना हाकलून दिल्याचे चर्चेला उदान आले आहे.



आज गेवराई तालुक्यातील अंतरवाली वावरेची येथील ग्रामस्थांनी मराठा आंदोलन कार्यकर्ते एक मराठा लाख मराठा च्या घोषणा देत असताना या वर्षातला पाहून गेवराईचे आमदार लक्ष्मण पवार व माजी मंत्री बबनराव लोणीकर हे पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी बीड लोकसभा मतदारसंघांमध्ये फिरत असतानाच या लोकसभेमध्ये तलवाडा येथून अंतरवली वावरेची येथे जात असताना रस्त्यातच मराठा आंदोलकांनी आडवी द्या गाड्या आणि गाड्या अडविल्याच्या नंतर त्या ठिकाणावरून माझी मंत्री बबनराव लोणीकर व आमदार लक्ष्मण आण्णा पवार हे त्या ठिकाणावर नाईलाजास्त त्यांना माघारी फिरावे लागले आहे यावेळी आंदोलकांमध्ये प्रचंड प्रमाणात घोष होतात आणि कोणत्याही पक्षाच्या किंवा समाजाच्या नेत्याला बीड जिल्ह्यातील कोणत्याही उमेदवाराला अंतरवाली येथे येऊन देणार नाहीत असा पवित्रा ग्रामस्थांनी घेतलेला आहे असे आंदोलन यांनी एक मराठा लाख मराठा जय जिजाऊ जय शिवराय अशा घोषणा देत आक्रमक पवित्रा दाखवून दिला आहेमराठा आरक्षणाचे जनक मराठा आरक्षणासाठी अख्या जगामध्ये गाजलेली नेतृत्व म्हणून मनोज दादा जरांगे पाटील यांच्याकडे पाहिले जाते मराठा आंदोलनासाठी आज भारताच्या इतिहासामध्ये नवे तर जगाच्या इतिहासामध्ये मनोज दादा जरांगे पाटील यांनी आज महाराष्ट्रामध्ये एक वेगळ्या प्रकारचं वादळ निर्माण करत सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन चालणारे मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाज एका छताखाली आणून सर्वांना आंदोलन करण्यासाठी भाग पाडले सर्व नेत्यांना बाजूला सरक मराठा समाजांनी मनोज दादा रंग पाटील यांच्यावरती विश्वास टाकला आणि तो विश्वास त्यांनी जिंकत मराठा समाजाचे मन हे जिंकलेले आहेत मनोज दादा जरांगे पाटील जे सांगतील तीच पूर्व दिशा म्हणून मराठा समाज येणाऱ्या लोकसभेमध्ये भाजप मुक्त मतदान करणार आहे आम्हाला ज्यांनी विरोध केला त्याला नक्कीच पाळा असेही मनोज दादा जरांगे पाटील यांनी या अगोदर सुद्धा सांगितलेले आहे म्हणून तर यावेळी भाजपच्या नेत्यांना प्रत्येक गावांमध्ये गेल्याच्या नंतर ते इज्जत होऊन त्या ठिकाणाहून परत गावाच्या बाहेर यावा लागत आहे निश्चित आहे परंतु यावेळी मनोज दादा जरांगे सांगतील तीच पूर्व दिशा असेल तेच तोरण आणि तेच धोरण मनोज दादा जरांगे पाटील जिंदाबाद असा नारा ग्रामीण भागामध्ये आज ऐकायला मिळत आहे.

- मराठा समाजाच्या उपऱ्या नेत्याला बीड जिल्ह्यातील मराठा समाज भिक घालत नाही मराठा आंदोलन आक्रमक
- माजी मंत्री बबनराव लोणीकर यांना मराठा समाजाने आंतरवाली वावरेची रस्त्यातच आडवत हाकलून दिले
- मराठा समाजासमोर बबनराव लोणीकर लक्ष्मण पवार<br>मराठा समाजातील आंदोलकांनी भाजपच्या नेत्यांना भेद करून लावले परत ?
- एवढा तालुक्यातील अंतरवाली वावऱ्याची येथील मराठा आंदोलकांनी भाजपच्या विद्यमान आमदार लक्ष्मण पवारांसह लोणीकरांचा ताप वाढवून गावांमध्ये घुसून न देण्याचा आक्रमक पवित्रा गावकऱ्यांनी घेतला लक्ष्मण पवार बबन लोणीकर अर्ध्या रस्त्यातूनच दौरा रद्द करून परतले.
- तलवाडा पोलिसांच्या मध्यस्थीने मोठा अनर्थ टळला.<br>बीड जिल्ह्यामध्ये पंकजा मुंडे यांना बाहेर जिल्ह्यातील प्रचार करण्याची वेळ आलेली असताना मराठा आंदोलन पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे
- एक मराठा लाख मराठा च्या घोषणांनी परिसर दुमदुमला
- बीड लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी गेलेल्या माजी मंत्री बबनराव लोणीकर व आमदार लक्ष्मण पवार जनतेच्या कशा पुढे नवी ला जास्त काढता पाय घ्यावा लागला.
- एक मराठा लाख मराठा घोषणा देत आमदार बबनराव लोणीकर यांचा अंतरवालीत होणारा कार्यक्रम रद्द

# अंबाजोगाईत उद्या पंकजाताईच्या प्रचारार्थ पीएम मोदींची सभा

### पंकजाताईच्या विजयाचे साक्षीदार होण्यासाठी सभेला उपस्थित रहा

बीड/ प्रतिनिधी

२०१४ पासून देशाचे सूत्र हाती घेतल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली देशात विकासाचा नया सूर्य उगवला, स्वातंत्र्य नंतर जगाच्या पाठीवर आपला देश अकच्या दहा वर्षात विकासाच्या प्रवाहात बदलून टाकला. अंतर राष्ट्रीय राजकारणात ज्यांच्या नेतृत्वामुळे

भारताची प्रतिष्ठा बादली. सथका साथ सबका विकास सूत्र डोळ्यासमोर ठेऊन, ज्यांनी गरीब कल्याणाचा रथ हाती घेतला. अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी केलेले प्रयोग ज्यामुळे आपण जगात पाचव्या क्रमांकावर आहोत. अन्यथा श्रीलंका, पाकिस्तान सारखी अवस्था आपली झाली असती. हे नेतृत्व पुन्हा तिसऱ्यांदा पंतप्रधान होणार हे त्रिवादी साथ असताना, त्यांचा सोबत आमच्या नेत्या पंकजाताईची होणारी उठ बस ज्याच वजन आणि नेतृत्व क्षमता हे पाहिल्यानंतर विकासाचा दरवाजा उपहा होईल. लोकसभा निवडणूक पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील जनता जनार्धनाचे आशीर्वाद घेण्यासाठी स्वतः नरेंद्र मोदी दिनांक ७ मे रोजी अंबाजोगाईत येणार, त्यात पंकजाताईचा विजय संकल्प पूर्ण होणार. या सभेला जिल्ह्यातील मायबाप जनतेने मोठ्या संखेने उपस्थित राहावे असे आव्हान भाजपा प्रदेश प्रवके राम कुलकर्णी, अक्षय मुंदडा यांनी केले.पंकजाताईच्या विजयाचे ...

प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे की, केंद्रात नरेंद्र मोदी पुन्हा प्रचंड बहुमताने सत्तेवर येणार यात आता तिळ मात्र शंका नाही. ज्यांनी मागच्या दहा वर्षात आपल्या



देशाचे भाग्य सर्व स्तरावर बदलून टाकले, विश्व गुरु म्हणून ज्यांना जगाच्या पाठीवर मान्यता मिळाली. विकासाचा संकल्प आणि गरीब कल्याण ज्यांच्याकडे दृष्टी आहे, ज्यांनी अर्थ व्यवस्थेत आपला देश पाचव्या क्रमांकावर आणला. पंतप्रधान म्हणून अमेरिका, रशिया, फ्रांस एवढेच नाही तर अनेक देशात ज्यांच्या नेतृत्वाचा बोलबाला होतोय. ज्यांनी आपल्या देशातले अनेक महत्वाचे प्रश्न मार्गी लावले. अयोध्येत प्रभू राम चंद्राचे मंदिर बांधले, काश्मीर ३७० कलम हाटवले, मुस्लिम तीन तलाक पद्धत बंद करून टाकली, सी ए ए कायदा मंजूर केला. एवढेच नव्हे तर ज्या पंतप्रधानाच्या एका फोनवर रशिया, यूक्रेन मध्ये सुरू असलेले युद्ध थांबले. ज्यामुळे पंधरा हजरापेक्षा अधिक तिथे अडकलेले भारतीय विद्यार्थी मायदेशी आणले. कोरोना सारख्या संकटात ज्यांनी १४० कोटी जनतेच्या जीवाचे रक्षण केले. हे सार करताना एकूण बाराशे पेक्षा अधिक गरीब कल्यानाच्या योजना देशात चालू केल्या. इनफास्ट्रकचर गती देताना राष्ट्रीय महामार्गाची उभारणी, रेल्वे मार्गाची गती वाढवून वंदे भारत रेल्वे सुरू केली. सक्सेसफुल पंतप्रधान नरेंद्र मोदी जनतेचे आशीर्वाद घेण्यासाठी अंबाजोगाईला येत असून, जागतिक कीर्तीचे नेतृवत्व पाहण्याची संधी निवडणुकीच्या निमित्ताने बीड करांना आली. आशा नेतृत्वाच्या सोबत उद्याच्या निश्चित खासदार पंकजाताई मुंडेची होणारी उठ बस खऱ्या अर्थाने जिल्ह्याचे भाग्य खुलणारी आहे. विजयी संकल्प सभा म्हणून याकडे आम्ही पाहतो ज्यात, पंकजाताईच्या विजायवर शिक्का मोर्तब होणार आहे. सभेसाठी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्यासह महायुतीचे नेते, शिवाय जिल्ह्यातील महायुतीचे लोकप्रतिनिधी, प्रमुख कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित रहाणार.

# माझी लंका–माझी लंका हा अहंकार बजरंगबलीने जाळून खाक केला होता

### प्रा. सुरेश नवलेंचा हल्लाबोल; रावणाचाही अहंकार हरला होता – भाजपने मतांचा बाजार मांडला तरी लोकशाही जिंकणार–वरेकर

बीड /प्रतिनिधी

रावणाला देखील अभिमान होता, माझी लंका माझी लंका हा अभिमान बजरंगबलीने जाळून खाक केला होता, त्यामुळे लोकसभेतील बीडचा अहंकार देखील जनतारूपी बजरंग धुळीला मिळवल्याशिवाय आता स्वस्त बसणार नाही असे माजी मंत्री सुरेश नवले यांनी सांगितले. लोकशाहीला संजीवनी देणारी निवडणूक म्हणजे बजरंग सोनवणे यांना निवडून देणे यामुळे रामराज्यासाठी बजरंग बली यांची तुतारी जिंकून द्या असे आवाहन गणेश वरेकर यांनी केले उभय नेते बीड शहरातील कॉर्नर बैठ्कात बोलत होते. बीड लोकसभेत भाजप मध्ये अहंकार चढला आहे, आम्हीच जिंकू या साठी जो अटापिटा चालला आहे लोकशाही विकत घेण्याचा प्रयत्न केला जातो आहे. अश्या वेळी सामान्य जनता

बजरंग अवतार धारण करत असते आणि नियती अहंकाराला पराभूत करत असते. बीड मध्ये असेक चित्र आहे, बीड मध्ये भाजपला अहंकार आलेला आहे. यामुळे आता बजरंग सोनवणे यांचा विजय काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे असे सुरेश नवले यांनी म्हटले आहे

### उत्स्फूर्त मतांचा टक्का निकाल लावणार–निजाम भाई

निवडणूक जनतेने हातात घेतली आहे, त्यामुळे कसलेही कटकारस्थान असो वा मत खरेदी चा प्रकार, जनतेचा पराभव करू शकत नाही. मराठ्याकडे बोट दाखवून ओबीसीची मते लाटायची असले उद्योग आता जुनी झाली . सलोख्याला आग लाऊन शेकत बसणारे नेते यावेळी तोंडघशी पडतील असे शेख निजाम यांनी म्हटले.

# २७ टँकरच्या माध्यमातून १८ गावांसह ४६ वाड्यांना पाणीपुरवठा!

### आष्टी तालुक्यातील स्थिती ;५७ प्रस्ताव प्रलंबित

आष्टी ।प्रतिनिधी

तालुक्यातील पाणीटंचाई च्या झळा बसु लागल्या असून पाण्यासाठी महिलांची वणवण भटकंती सुरू असताना मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून २७ टॅकरच्या माध्यमातून १८ गावांसह ४६ वाड्यांना पाणीपुरवठा सुरू करण्यात आला असला तरी अद्याप ५७ प्रस्ताव प्रलंबित आहेत.

आष्टी तालुक्यात पाणीटंचाई निर्माण झाली असून विहीर,बोअर तळाला गेल्याने व नदी नाले कोरडेठाक पडल्याने पाण्याचे मोठे संकट ओढावत चालले आहे.पाणीटंचाई दूर व्हावी महिलाची भटकंती थांबावी म्हणून पंचायत समितीच्या माध्यमातून नागरिकांच्या मागणीनुसार २७ टँकरने १८ गावांसह ४६ वाड्यांना इमनगांव, उंदरखेल, मेहकरी,मातकुळी,नागतळा या पाच ठिकाणच्या उद्धवामधुन पाणीपुरवठा केला जात आहे.तर ५७ प्रस्ताव विविध कारणामुळे अद्याप मंजुर झाले नसल्याने ते प्रस्ताव तहसील कार्यालयात प्रलंबित आहेत.

# बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्यासाठी शिवसेना तालुकाप्रमुख बाबासाहेब सराफ रात्रीच्या १० वाजता गाव खेड्यात

## बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ जिवाचं रान,रात्रीचा दिवस दिवसाची रात्र करून शिवसेना तालुकाप्रमुख बाबासाहेब सराफ यांनी धारूर तालुका पिंजून काढला

धारूर ।प्रतिनिधी
बीड लोकसभेचे महाविकास आघाडीचे लोकप्रिय उमेदवार शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख बाबासाहेब सराफ यांचा धारूर तालुक्यात झंझावती गाव तिथे बप्पा दौरा केला.बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्यासाठी धारूर तालुक्यातील गाव खेडे पिंजून काढले.तसेच रात्रीचा १० वाजता गाव खेड्यात तळ ठोकून होते.धारूर तालुक्यातील शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सर्व पदाधिकार्यांना जिवाचं रान करून बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्यासाठी मोठ्या ताकदीने प्रचार करत आहेत .धारूर तालुक्यातील विविध गावात बोलताना बाबासाहेब सराफ म्हणाले की लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी बजरंग सोनवणे यांना निवडून द्यावे लागेल अन्यथा आपल्याला पुन्हा हुकुमशाही पाहावी लागणार आहे.भाजप पक्ष हा सध्या देशात हुकुमशाही पसरवायचे काम करत आहे. विकासाला मत देण्याशिवाय आपल्याला पर्याय नाही गेल्या



दहा वर्षांमध्ये बीड जिल्ह्याचा विकास पूर्णपणे खुंटलेला असून येणाऱ्या काळात बीड जिल्ह्याचा विकास करण्यासाठी बजरंग सोनवणे यांच्यासारख्या कार्यतत्पर सर्वसामान्य जनतेसाठी दिवस-रात्र झटणाऱ्या बजरंग सोनवणे यांना प्रचंड बहुमताने विजयी करून लोकशाही जिवंत ठेवण्याचे काम धारूर तालुक्यातील जनतेने करावे.तुतारी वाजवणारा माणूस या किन्हासमोरील बटन दाबून बजरंग सोनवणे यांना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन शिवसेना तालुकाप्रमुख बाबासाहेब सराफ यांनी धारूर तालुक्यातील विविध गावात बोलताना आवाहन केले.यावेळी:-शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख बाबासाहेब सराफ, विनायक ढगे, राजकुमार शेटे, किशोर बारस्कर,अमोल सिरसट यांच्या सह शिवसेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.




शिक्षण घेऊन गावामध्ये बसण्यापेक्षा आणि शहरात नोकरीच्या शोधात हिंडण्यापेक्षा स्वतःचा छोटा का होईना व्यवसाय पाहिजे.व्यवसायात माणूस स्वतः मालक असतो,प्रत्येकाने नोकरीचा अट्टाहास न करता व्यवसाय-धंदा याकडे वळल पाहिजे. असाच माझा एक सहकारी सचिन परजने याने खालापूरी येथे चालू केलेला बांधकाम वस्तू विक्री व्यवसायाला मी भेट दिली.तरुण पिढी व्यवसायात रस घेऊन स्वतः च साम्राज्य उभे करताना पाहून मनोमन आनंद झाला, या व्यवसायाला शुभेच्छा देताना मा.सम्राट डॉ जितीनदादा वंजारे खालापूरीकर.

# शितलताई लांडगे यांच्या नेतृत्वाखाली विविध पक्ष संघटनांचा बजरंग सोनवणे यांना जाहीर पाठिंबा

## शितलताई लांडगे यांच्या उपस्थितीत विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न.

**बीड /प्रतिनिधी**
**आज केज येथे सौ.शितलताई लांडगे यांच्या नेतृत्वाखाली लोकसभा २०२४ निवडणुकी दरम्यान बीड जिल्ह्यातील मातंग समाजाच्या विविध छोट्या मोठ्या संघटनेच्या पदाधिकारी यांची बैठक -व रवींद्र पाटोळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली बैठकीची सुरुवात परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस वंदन करून करण्यात आली .**

या बैठकीत सर्व पदाधिकाऱ्यांनी आपापले विचार मांडत, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या अधिकृत उमेदवार शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला तसेच जिल्ह्यातील मातंग समाजांचे मतदान बप्पांना देऊन प्रचंड मताने विजय करण्याचा संकल्प हाती घेतला आहे यावेळी उपस्थित असलेले मातंग समाजाचे कार्यकर्ते लवकरच कामाला लागणार आहेत . आजच्या बैठकीला उपस्थित रव. रवींद्र पाटोळे( माजी जिल्हाध्यक्ष - वंचित बहुजन आघाडी बीड )-व .सतीश शिंदे ( संस्थापक अध्यक्ष-मानवाधिकार लढा ) राजन सुतार (मानव अधिकार लढा) गेवराई विलास गुंजाळ ( शहराध्यक्ष वंचित



बहुजन गेवराई), संतोष नरसिंगे (युवा आंदोलन) आंबेजोगाई, राम शेंडगे (संस्थापक अध्यक्ष बहुजन अधिकार आंदोलन) धारुर, तानाजी दुनघव , केज अनिल गालफाडे (मानव हित लोकशाही पक्ष) केज, अशोक पालके (संस्थापक अध्यक्ष- युवा आंदोलन संघटना) आंबेजोगाई सतीश मुजमुले(पत्रकार वडवणी) राजाराम जाधव (मानव अधिकार लढा बीड ), जितेंद्र मस्के (परळी वैजनाथ), बबनराव लांडगे (मंडळ अधिकारी) आंबेजोगाई ज्येष्ठ कार्यकर्ते बाबुराव गालफाडे केज वरील सर्व कार्यकर्त्यांनी बजरंग बप्पांचे प्रतिनिधी म्हणून आलेले पंचायत समिती सदस्य तथा शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणे मित्र मंडळाचे ता.अध्यक्ष शिवाजी चौधरी, नगरसेवक भाऊसाहेब गुंड, नगरसेवक बालाजी जाधव, बप्पा चे खंदे समर्थक शरीफ भैया सय्यद, कपिल भैया मस्के यांच्या प्रमुख उपस्थित हा निर्णय घेतला तथा लवकरच मातंग समाजाचा मेळावा लावण्याचे आवाहन करून हे सर्व मडळी पत्रकार परिषद घेणार आहेत .

# नवे कॉलेज नवे सत्र, अनोळखी शहर जिवलग मित्र....!

मित्रता एकमैत्री हे एक असं नातं आहे जो व्यक्ती स्वतःच्या मर्जीने निवडत असतो. आपल्या आयुष्यामध्ये हजार व्यक्ती येतात अन जातात पण प्रत्येकामध्येच माणसाचं मन रमत नाही आणि त्यांच्याशी मित्रताही होत नाही पण असा एखादा कोणीतरी भेटला की जो आपल्या विचारांचा मिळताजुळता असेल किंवा आपल्याला समजून घेऊन आपल्या सुखदुःखात आपल्या नेहमी सोबत असतो अशा सोबत मैत्री ही लवकर होते.आजकाल मित्रांची अनेक श्रेणींमध्ये विभागणी केली गेली आहे जसे की समान छंद असलेले मित्र, व्यावसायिक मित्र, कामाच्या ठिकाणी मित्र, इ. पण खऱ्या मित्रांमध्ये तेच गुण असतात, जे आपल्या मध्ये असतात.

मित्र हा असा शब्द आहे की आई-वडिलांनंतर किंवा आपल्या कुटुंबा नंतर आपल्या सर्व वैयक्तिक गोष्टी आपण ज्या व्यक्तीला सांगतो तो आपला मित्र असतो. मित्र आपल्या सर्व सुखदुःखात सहभागी तर होतोच पण जो आपल्या भावभावना समजून घेतो किंवा आपल्या चेहऱ्यावरून आपण दुःखी आहोत का आनंदी हे सहज ओळखतो तो म्हणजे एक जवळचा मित्र मी अनुभवलेले आहे प्रेम नक्कीच रडून जाते पण ब्रेक-अप



झाल्यानंतर स्वतःचा अनुभव सांगून चेहऱ्यावर स्मित असणारा हा मित्रच असतो. तर मला असं वाटतं की मित्राचे दोन प्रकार पडतात. एक प्रकार म्हणजे तो मित्र आपल्या खूप जवळचा असतो आणि आपल्या सर्व समस्या समजून घेणारा असतो. आणि मित्राचा दुसरा प्रकार म्हणजे वा आपला मूड नसताना देखील आपल्याला हसवण्याचा प्रयत्न करतो असे दोन प्रकारचे मित्र प्रत्येकाच्याच आयुष्यामध्ये असतात. असे म्हटले जाते की ज्या व्यक्तीचे मित्र राहत नाही, तो सर्वांत दुर्भाग्यशाली असतो. आणि असेही म्हणतात की कपटी मित्रापेक्षा दिलदार शत्रु बरा. खरे मित्र मैत्रीण नेहमी एकमेकांचे सुखदुःख वाटून घेतात. खरे मित्र बनवले जात नाहीत तर ते स्वभावानेच बनून जातात. आपला स्वभाव कसा आहे व कोणत्या प्रकारचा आहे यावरून आपले मित्र बनत असतात जर तुमचा स्वभाव मनमिळाव असेल तर मैत्री ही तशाच प्रकारच्या व्यक्तीशी होते पण जर तुमचा स्वभाव कपटी असेल किंवा तुमच्यात एखादा दुर्गुण असेल तर मैत्री हो तशाच स्वभावाच्या व्यक्तीशी होते आजच्या या लेखाच्या माध्यमातून मी माझ्या एका जिवलग मित्राच्या स्वभाव गुणामुळे आमची मैत्री घट्ट कशी होत गेली याचे वर्णन करणार आहे. तर आपल्या महाविद्यालयीन जीवनामध्ये आपल्याला हजारो संख्येने मित्र भेटतात पण त्यातील काही मोजकेच असे मित्र असतात की जे काळजाचा तुकडा बनून जातात. त्यांच्यासोबत फिरणे, गप्पागोष्टी करणे, कॉलेजच्या कॅन्टीन वर बोलत बोलत चहा पिणे असे पूर्ण दिनक्रम त्यांच्यासोबतच पार पडतात. आणि मोजकेच मित्र हेच मनात राहतात त्यांच्यासोबत आपला सहवास हा जास्तीचा असतो आणि समविचारी मित्र असेल तर ते कधीही विसरता येत नाही.माझ्याही आयुष्यात आहे आणि तो मित्र म्हणजे मयूर कट्यारमल तसे आमचे भेट एम ए ला अमरावती येथे व्ही एम व्ही कॉलेजला आलो असताना झाली. दोघेही शिकायला सोबतच आहोत आणि एकमेकांच्या जरा जास्त जवळचे सुद्धा म्हणजे मनाने विचाराने एकमेकांच्या हृदयाच्या थोडेसे जास्तच जवळ आहोत. एखाद्या गोष्टीचे वाईट वाटले किंवा एखादा दुःख झालं तर त्याला न सांगताही कळून जात.

योगायोग एकमेकांचे विचारही सारखेच आहे.वएकमेकांच्या संपर्कात राहून आम्ही नेहमीच छोट्या मोठ्या अडचणी समजून घेत एकमेकांना सहकार्य करत कॉलेजचा प्रवास सुरू केला आहे.

# वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभा उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ बुधवारी ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांची बीड येथे जाहीर सभा

## गावागावात होत आहे अशोक हिंगे यांच्या विजयाचा निर्धार!

बीड ।प्रतिनिधी
वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभा उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ दि. ०८ मे २०२४ बीड शहरात सायंकाळी पाच वाजता प्रचार सभा होत आहे. या बैठकीमध्ये गाव, तांडा, वाडी वस्ती मधील जास्तीत जास्त मतदार सभेला कशा पद्धतीने उपस्थित राहतील यासाठी नियोजन सुरू आहे. रेकॉर्ड ब्रेक करणारी ही सभा घेण्यात येईल असा निर्धार वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी केला आहे.



वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ गावागावांमध्ये मोठी यंत्रणा उभारण्यात आली असून प्रचार रथ, बॅनर यासह पथनाट्य कलापथक अशोक हिंगे पाटील यांच्या विजयासाठी कार्यान्वित करण्यात आले आहे. मतदार तिथे वंचित बहुजन आघाडीचा पदाधिकारी उभारण्यात आला असून गेल्या आठ दिवसांपासून अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते संपूर्ण बीड जिल्हा पिंजून काढत आहेत. गेल्या शुक्रवार दि. ३ मे रोजी अंबाजोगाई शहरात ड. प्रकाश आंबेडकर यांची रेकॉर्ड ब्रेक सभा संपन्न झाली असून अशोक हिंगे यांच्या विजयावर शिक्कामोर्तब झालेला आहे. आता येत्या बुधवार दि. ८ मे २०२४ रोजी बीड शहरामध्ये प्रकाश आंबेडकर यांची जाहीर सभा होणार असून या सभेमुळे अशोक हिंगे पाटील यांचा विजय निवडणुकीपूर्वीच निश्चित होणार असल्याचा विश्वास नागरिक व्यक्त करीत आहेत.

बीड शहरात होत असलेल्या या जाहीर सभेसाठी वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. रेकॉर्ड ब्रेक होणाऱ्या या सभेसाठी बीड लोकसभा मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदार नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अशोक हिंगे पाटील यांनी केले आहे.

वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभेचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ गावागावांमध्ये प्रचार रथ, बॅनर, पोम्प्लेट मतदारापर्यंत पोहोचविले जात असून पथनाट्याच्या माध्यमातून मतदार नागरिकांमध्ये जागृती करण्यात येत आहे. वंचित बहुजन आघाडीला मतदान म्हणजेच विकासाला मतदान हे मतदार नागरिकांच्या मनावर बिंबविले जात असून या माध्यमातून अनेक मतदारांचे मन परिवर्तन करण्याचे उपक्रम वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून होत आहे.

# कड्यात राष्ट्रीय महामार्गावर पाणी न मारल्याने धुळीचे साम्राज्य!

## वाहनधारका सह नागरिकांचे आरोग्य धोक्यात

आष्टी ।प्रतिनिधी
येथे गेल्या एक वर्षापासून राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू असून जागोजागी खोदकाम करुन ठेवले आहे. या कामावर पाणी न मारल्याने मोठ्या प्रमाणावर धुळीचे लोळ उडत असल्याने वाहनधारकासह स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असुन संबंधित विभागाकडून मात्र दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

अहमदनगर बीड राष्ट्रीय महामार्गावरील साबलखेड, कडा , शेरी,वटणवाडी, जळगांव,कासारी ही गावे आहेत. कडा ते साखर कारखाना हे काम झाले आहे .कडा शहरात मात्र गेल्या अनेक दिवसापासून खोदकाम करुन ठेवले आहे.या खोदकामावर जसे जमेल तसे पाणी मारत आहेत.दिवसातून तीन वेळा पाणी मारणे बंधनकारक आहे मात्र कधी तीन दिवसाला तर कधी चार दिवसाला ते पण अर्धवट पाणी मारत असल्याने धुळीचे लोटरस्त्यावर पसरत आहेत त्यामुळे स्थानिक रहिवाशी व वाहनधारक यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.

त्यात कडा ही मोठी बाजारपेठ असून याठिकाणी ३० ते४० गावचे लोकं आपले दैनंदिन व्यवहारासाठी येत असतात.धुळीपासून सरक्षण करण्यासाठी खबरदारी चा उपाय केलेला दिसून येत नाही यामुळे धूळ डोळ्यात जाऊन अपघात होत आहेत तर याला जबाबदार कोण ? अशा प्रश्न उपस्थित केला जात आहे. हा राष्ट्रीय महामार्ग असल्याने या रोडवरून लहान मोठ्या वाहनांची संख्या जास्त प्रमाणात असल्याने या राष्ट्रीय महामार्गावर मोठं मोठी जड वाहने व आलिशान गाड्या भरधाव वेगाने जात असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर धुळीचे साम्राज्य निर्माण झाले असून या धुळीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे व नागरिकांचे डोळे, श्वसनाचा त्रासामुळे आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सध्या या महामार्गाचे काम चालू असल्याने त्यावर ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यामुळे वाहन चालकासह मोटरसायकल वर प्रवास करणारे प्रवासीवर्ग पूर्णपणे त्रस्त झाला असून याकडे राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी पूर्णपणे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते अनिल ढोबळे यांनी केला आहे.

धूळ प्रवाशांच्या व महामार्गावरील परिसरात असणार्या गावातील नागरिकांच्या नाकातोंडासह अंगावर उडत आहे. यामुळे येथील रोडलगत असलेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचा , नागरिकांच्या व प्रवाश्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ही धूळ नागरिकांच्या नाका तोंडात जाऊन सर्दी, खोकला, व श्वसनाच्या आजाराला सामोरे जावे लागत आहे. सध्या या राष्ट्रीय महामार्गाचे काम कडा परिसरात सुरु असून गेल्या चार पाच दिवसापासून पाणी मारणे बंद केले आहे.दिवसातून दोन वेळा पाणी मारण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.



**बीड-माजी राज्यमंत्री दिलीप कांबळे यांचा सत्कार करताना जेष्ठ अशोक सोनवणे,भाजपा नेते अनिल चांदणे,भाजपा अनुसुचित जाती मोर्चा बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर**



प्रतिनिधी (दत्ता वाघमारे)
लोकसभा २०२४ निवडनुक प्रचारासाठी तालुका पाटोदा या ठिकाणी पंकजा ताई गोपीनाथ मुंडे साहेब आल्या असता पाटोदा तालुक्यामधील लहुजी शक्ती सेना ही जरी लहान संघटना असली तरी युतीधर्म म्हणून आमचे कार्यकर्ते गाव न गाव पिंजून काढून बीड जिल्हातील सर्वाधिक मतादान या पाटोदा तालुक्यामधून ताईसाहेबांना देतील अशी ग्वाही आज ताई साहेबांच्या सत्कारा वेळी तालुका अध्यक्ष उमेश क्षीरसागर यांनी ताईसाहेबांना दिली असता ताई साहेबांनी समाधान व्यक्त केले.सदर सत्कारा वेळी लहुजी शक्ती सेनेचे पदाधिकारी अनिल क्षीरसागर,संकेत अडागळे, बाबासाहेब पुलावळे इत्यादी उपस्तिथ होते.

# सकल चर्मकार समाजाचा पंकजाताई मुंडेंना पाठींबा

माजलगाव ।प्रतिनिधी

बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना बीड सकल चर्मकार समाजाच्यावतीने आज माजलगावात मेळावा घेत जाहीर पाठींबा देण्यात आला. चर्मकार समाजासाठी भाजपा सरकारने अनेक योजना राबविल्या असून त्याचा फायदा समाजातील विविध घटकांना झालेला आहे. त्यामुळे समाजाने एकमुखाने निर्णय घेऊन पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात महायुतीच्या पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला.



माजलगाव येथील वैष्णवी मंगल कार्यालयात हा मेळावा पार पडला. मेळाव्यासाठी माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजलगाव विधानसभा प्रमुख मोहनराव जगताप, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य प्रशांत पाटील, अच्युतराव लाटे, अमरनाथ खुर्पे, कृऊबा सभापती मंगेश तोंडे, संजावनी राऊत, राहुल साळुंके, रविंद्र बोराडे, सुनिता नेटके, शारदा वाघमारे यांची उपस्थिती होती.

माजी मंत्री बबनराव लोणीकर म्हणाले, केंद्रातील भाजपा सरकार हे गोरगरींबांसाठी काम करणारे सरकार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे भारताची मान जगात उंचावलेली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ४०० पारचा नारा देण्यात आला असून त्यासाठी बीडमधून पंकजाताई मुंडे यांना विजयी करावे, असे आवाहन बबनराव लोणीकर यांनी केले. समन्वयक नानासाहेब घोडके यांनी यावेळी चर्मकार समाजाच्या वतीने अनेक मागण्या केल्या. त्यात प्रामुख्याने संत रोहीदास चर्मोद्योग विकास महामंडळ (लीडकॉम) मागील सर्व कर्ज माफ करण्यात यावे. २०२४ पर्यंतचे कर्ज प्रकरणे निकाली काढून तात्काळ वाटप करण्यात यावेत. मागासवर्गीयांची अस्वच्छ कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती पुर्ववत चालू करावी. डॉ बाबासाहेब आंबेडकर निर्वाह भत्ता प्रकरणात शहरापासून ७ कि.मी. अंतरावरील अट रद्द करावी. गाव सोडून आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला याचा लाभ मिळावा. जिल्ह्यात संत रविदास सभागृहासाठी जास्तीत जास्त फंड देण्यात यावा. रमाई घरकूल आवास योजनेची रक्कम वाढवण्यात यावी. गटई स्टॉल मागणी अर्ज दोन वर्षापासून प्रलंबित आहेत, त्याला ताबडतोब मंजूरी देऊन वाटप करण्यात यावेत. आदी मागण्या घोडके यांनी केल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष कांबळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके, युवक जिल्हाध्यक्ष राजेश जाधव, प्रदेश युवा उपाध्यक्ष ॲड.गणेश गवळी, ॲड दत्ता जाधव, सचिन, तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष राजू उनवणे, कर्मचारी जिल्हाध्यक्ष सुनील माने, उपाध्यक्ष बालासाहेब गवळी, प्रभाकर भालशंकर, मधुकर ठोसर, संजय भागवत, प्रसाद वाघमोडे, डीगांबर कांबळे, सुभाष कांबळे, सुभाष कांबळे, विक्की मराठे व सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उन्हाच्या तडाख्यात नांगरणीची लगबग, आधुनिक पद्धतीचा वापर

माजलगाव ।प्रतिनिधी

सध्या माजलगाव मध्ये उन्हाचा तीव्र तडाखा जाणवत असून सादोळा शिवारात शेतातील जवळपास सर्वच पिके निघून गेली आहेत. पावसा अगोदर जमिनीची मशागत केल्यास उत्पादन क्षमतेत वाढ होत असल्याने शेतकऱ्यांची तीव्र उन्हातही नांगरणीसाठी लगबग सुरू असल्याचे दिसून येते. उन्हाच्या तडाख्यात जमिनीची नांगरट केल्यास शेती चांगली तापते. खरीप हंगामात पिके जोमाने येतात. शेतात गवत होत नाही अशी धारणा आहे. सध्या जमिनीची आधुनिक पद्धतीने नांगरट करण्याची पद्धती वापरली जाते.सादोळ्या त जवळपास घरोघरी ट्रॅक्टर असल्याचे चित्र आहे त्यामुळे ट्रॅक्टरचा वापर करून जमिनीची मशागत केल्यास जमिनीची उत्पादन क्षमता वाढते, मातीची चांगली पलटी होऊन पिके जोमाने येतात. उन्हाचा तडाखा वाढल्याने शेतीची जवळपास संपूर्ण कामे झाली आहेत. जमीन नांगरणीसाठी जवळपास एकरी दोन हजार रुपये खर्च येतो. पाऊस पडल्यानंतर जमिनीची पुन्हा मशागत करावी लागते. कापूस, सोयाबीन, तूर, हरभरा, जवारी तीळ, , गहू आदी पिके निघून गेल्यानंतर जमिनीची नांगरट करण्याची पद्धत आहे. ओलीताच्या



काही शेतामध्ये अजूनही पिके असल्याने हिरवळ दिसून येते. सादोळा परिसरातील बहुतांश शेतातील पिके निघून गेल्याने उन्हाच्या तडाख्यात नांगरणीची लगबग दिसून येते. जिरायती शेती मधून कमी उत्पादन मिळते.

सादोळा परिसरात बैलांच्या दावणी रिकाम्या

आल्याचे दिसून येते. सालगड्याचे भाव लाख ते दीड लाख रुपये पर्यंत आभाळाला टेकले आहे. यामुळे शेती करण्याच्या खर्चात सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. उन्हाळयाच्या सुरुवातीलाच पावसाळ्यापूर्वी लवकर जमिनी नांगरून टाकल्या की पीक जोमाने येते अशी पद्धत आमच्या भागात प्रचलित आहे..

भाई लहु सोळंके

पारंपारिक पद्धतीची नांगरट आता इतिहास जमा झाल्याचे दिसून येते. पूर्वी बघायला मिळणाऱ्या प्रत्येक कास्तकारांकडील बैल जोड्या आता दिसत नाही. एका शेतकऱ्याच्या दावणीला दोन ते तीन बैल जोड्या दिसायच्या. बदलती शेती व महागाईमुळे बैल जोड्या टिकविणे जिकरीचे झाले आहे. . .. शेतकरी नेते कृष्णा सोळंके सादोळा




खरा निष्ठावंत भाऊ म्हणून विशाल बाई यांची ओळख आहे स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांचे विश्वास कार्यकर्त्यांपैकी एकमेव असलेली मुस्लिम समाजातील सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन सुखदुःखामध्ये सदैव हजर राहणारे इर्शाद भाई हे पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी सर्व मुस्लिम बांधवांना पंकजाताई मुंडे यांच्या बद्दल माहिती सांगून सविस्तर चर्चा करत करून मुस्लिम समाजाचे मतदान पंकजाताई मुंडे यांना का पडायला पाहिजे व पंकजाताई मुंडे या माझ्या बहिण आहेत आणि माझ्या बहिणीच्या पाठीशी आपण उभा राहा म्हणून शेख इरशाद भाई हे सदैव पंकजाताई मुंडे व प्रीतम ताई मुंडे यांच्या पाठीशी उभा राहत असताना स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या आठवणींना उजाळा देत त्या ठिकाणी मुस्लिम बांधव पंकजाताई मुंडे यांना मतदान करण्यासाठी कटिबद्ध आहोत अशी भावना मुस्लिम समाजातून व्यक्त होऊन त्या भावनांचा आदर करून आपण सदैव मुस्लीम समाजाच्या पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून मुस्लिम समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहोत असेही इर्शाद भाई यांनी सांगितलेले आहे इरशाद भाई यांनी समाज बांधवांना ताईच्या मतदान करण्याच्या आव्हान केल्याचे इरशाद भाई दिसत आहेत

# जिल्हा रुग्णालयात 'एमआरआय ' मशिन अभावी तर स्वरातीचे सिटी स्कॅन ४ महिन्यांपासून बंद रुग्णांची हेळसांड

शासनकर्ते उदासीन:- डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

सध्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराची रणधुमाळी असुन विकासाच्या पोकळ गप्पा मारणा-या लोकप्रतिनिधी आणि शासनकर्ते यांची सर्वसामान्य लोकांना आरोग्य सुविधा देण्याबाबत उदासिनता दिसून येत असुन जिल्ह्यातील सर्वांत मोठी आरोग्य संस्था असलेल्या जिल्हा रुग्णालयात अपघात,मेंदुत ताप गेलेले रूग्ण, शरीरातील नसांच्या वेदना आदि आजारांचे निदान करण्यासाठी आवश्यक असणारे एमआरआय मशिन सारखे उपकरण उपलब्ध नसल्याने निदान व उपचारास उशिर होत रूग्णांची हेळसांड होत असुन खाजगी केंद्रात जाऊन आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे तर अंबेजोगाई येथील स्वरातीतील सिटी स्कॅन मशिन वारंवार नादुरुस्त असल्याने ४ महिन्यांपासून बंद आहे त्यामुळे तातडीने जिल्हा नियोजन निधीमधून निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर,शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, मुस्ताक शेख यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, आरोग्य मंत्री, आरोग्य सचिव, पालकमंत्री बीड यांना केली आहे.

राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने १५ आगस्ट २०२३ पासुन सर्व तपासण्या आणि उपचार मोफत करण्याचा निर्णय घेतला आहे.मात्र औषधी,उपकरणे आणि तज्ञ पुरवताना हात आखडता घेतला असुन यामुळे सामान्य रूग्णांची हेळसांड होत असुन बीड जिल्हा रुग्णालयात रोज आंतररुग्ण विभागात ५०० च्या वर रुग्ण असतात तर बाह्यरुग्ण विभागात तपासणीसाठी ७०० हुन अधिक रुग्ण येतात.दरम्यान अपघाती रुग्ण , मेंदुत ताप गेलेले रुग्ण, शरीरातील नसांच्या वेदना आदि आजारांचे निदान करण्यासाठी एमआरआय मशिनसारख्या उपकरणांची आवश्यकता असते.बीड जिल्हा रुग्णालयाला ७० वर्षे कालावधी उलटूनही जिल्ह्यातील सर्वात मोठी आरोग्य संस्था असलेल्या जिल्हा रुग्णालयात हे उपकरण नाही.या उपकरणासाठी सामाजिक कार्यकर्ते यांनी आंदोलने करूनही शासनकर्ते




आणि धोरणकर्ते यांच्यात फरक पडला नाही. जिल्हा रुग्णालयात एमआरआय मशिन उपलब्ध नसल्याने जिल्हा रुग्णालयात आलेल्या रूग्णांची एमआरआय उपकरणाद्वारे तपासणी करायची असेल तर त्याला खाजगी केंद्रात तपासणीसाठी जावे लागते.आजारी रूग्णांची यामुळे फरपट होते.येण्याजाण्याच्या वेळेमुळे आजाराचे निदान व उपचार होण्यास उशीर होतो आणि तपासणी शुल्क भरावे लागत असल्याने आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. त्यामुळे एमआरआय मशिनसाठी जिल्हा नियोजन निधीतून निधी उपलब्ध करून देण्यात यावा.ग्रामीण भागातील सर्वसामान्य रुग्णांचा आधार असलेल्या स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयातील सिटी स्कॅन मशिन दुरुस्तीचे प्रयत्न निष्फळ ठरले असुन गेल्या ४ महिन्यांपासून मशिन बंद अवस्थेत आहे.त्यामुळे रूग्णांना खाजगी सिटी स्कॅन केंद्राचा नाहक भुर्दंड सहन करावा लागत आहे.अंबेजोगाई येथील स्वाराती रूग्णालयातील सिटी स्कॅन मशिनला १२ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला असल्याने त्याचे अपग्रेडेशन अथवा नविन यंत्राचे भाग बसवावे लागतात.मध्यंतरी जिल्हा नियोजन निधीतुन उपलब्ध झालेल्या ८० लाख रुपये निधीतुन अपग्रेडेशनसाठी संबंधित कंपनीच्या अभियंत्यांच्या पथकाने ३ दिवस काम करून यंत्र सुरू केले मात्र पुन्हा एक तसातच बंद पडले.दुसरा यंत्राचा भाग निकामी झाल्याचे अभियंत्याने स्वराती प्रशासनाला कळवले असुन रुग्णांची हेळसांड होऊ नये यासाठी नविन सिटी स्कॅन मशिनची आवश्यकता असुन त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

# वंचित बहुजन आघाडी च्या आयडियल प्रचारने महायुती, महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी घेतली धास्ती

## अशोक हिंगे यांना गावागावातून मिळतोय मोठा प्रतिसाद

बीड ।प्रतिनिधी

बीड लोकसभे च्या प्रचाराचा दुसरा टप्पा संपत आला असून बीड जिल्ह्यात महायुती, महाविकास आघाडी आणि वंचित बहुजन आघाडी अशी तिरंगी लढत दिसून येत आहे मात्र उमेदवार अशोकराव हिंगे पाटील यांच्या आयडियल प्रचाराने विजयाकडे वाटचाल चालू केली आहे गावोगावी,तांडा वस्तीवर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोकराव हिंगे पाटील यांचे जोरदार स्वागत करून वंचित बहुजन आघाडीलाच निवडून देणार असल्या ची हमी मतदार देत आहेत यामुळे महायुती, महाविकास आघाडी च्या उमेदवारानी धास्ती घेतली आहे तर त्यांचा प्रचार फीका पडला आहे

सध्या बीड लोकसभेच्या प्रचाराची रणधुमाळी जोरात चालू असून सर्वच पक्षांची प्रचारासाठी धावाधाव चालू आहे महायुती महाविकास आघाडी च्या दोन्ही उमेदवारांनी निवडणुकीला जातीचा रंग दिला आहे मात्र पुरोगामी महाराष्ट्रात जातिवादाला थारा मिळणार नाही इथे विकासावर निवडणुका होतात ही बाब लक्षात घेऊन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी आयडियल प्रचार चालू केला आहे प्रत्येक गावात जाऊन तेथील मूलभूत सुविधा सोडवण्याची हमी देत आहेत, तरुणांच्या हाताला काम, शेतकऱ्याच्या मालाला मुबलक दाम मिळवून देण्यासाठी मला संसदेत पाठवा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील करत आहेत त्यांच्या या आव्हानाला बीड जिल्ह्यातील सुज्ञ मतदाराकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे यामुळे महायुती महाविकास आघाडी च्या उमेदवारच्या पायाखालील वाळू सरकू लागली आहे महायुती, महाविकास आघाडीचा प्रचार अडगळीला पडत असल्याने वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांचा विजय निश्चित आहे

महाराष्ट्र मधून दिन दलित गोरगरीब मराठा, मुस्लिम, साळी माळी कोळी, हटकर, धनगर, वंजारी, बंजारा, चांभार कुंभार आदी घटकांसाठी काम करणारा पक्ष म्हणजेच वंचित बहुजन आघाडी हे महाराष्ट्रातील सुज्ञ मतदारांच्या लक्षात आले आहे त्यामुळे १३ मे रोजी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटीलयांच्या वर मतदान रुपी पडेल गॅस सिलेंडर चिन्हा समोरील बटन दाबून वंचितांचा आवाज लोकसभेत गेल्याशिवाय राहणार नाही असे चित्र आहे देशाला महागाईचा काहीतरी लोटणाऱ्या भारतीय जनता पार्टीला नरेंद्र भाई मोदी यांना सत्तेपासून दूर ठेवण्याची गरज असल्याचेही अशोक हिंगे पाटील यांनी सांगितले प्रकाश आंबेडकरांचे हात बळकट करण्यासाठी घटनेचा




संरक्षण करण्यासाठी वंचित बहुजन विकास आघाडी संसदेत जाणे खूप गरजेचे आहे अशोक पाटील यांनी सांगितले म्हणून गॅस सिलेंडर समोरील बटन दाबून प्रचंड मताधिक्यानी विजयी करावे आसे आवाहन अशोक हिंगे पाटील यांच्या वतीने करण्यात येत आहे.त्या मध्ये शहराध्यक्ष लखन जोगदंड,अक्षय गायकवाड, अर्जुन गायकवाड, रोहित गायकवाड, सुजल गायकवाड, विजय गायकवाड, प्रकाश गायकवाड, अनिल वाघमारे, सुनील वाघमारे, मंगेश वाघमारे, शंतनू वाघमारे, ओमकार केदार, अभिमान केदार, अक्षय केदार, विनोद वडमारे, महेश सोनवणे, शुभम जाधव,राहुल जाधव, अक्षय जाधव, राहुल अड्डागळे, अनिल थोरात, जितेंद्र केदार, गौतम शिंदे, सचिन केदार, गणेश भांगे, रोहित कसबे, महेश वाघमारे, अनिल शिरसागर, अविनाश अडगळे, अंबादास गायकवाड, अभिजीत खांडेकर, गणेश ठोकळ,आदी सहभागी होते.



# पंकजाताई मुंडे यांना निवडून देण्याचा कुसळंब करांचा निर्धार!

## भव्य संपन्न झाली जाहीर सभा; नेते, कार्यकर्त्यांसह मतदार बांधवांची मोठी उपस्थिती

**कुसळंब ।प्रतिनिधी**

**लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या कन्या, माजी मंत्री आणि गोपीनाथराव प्रतिष्ठानच्या अध्यक्षा आणि भाजपा आणि मित्र पक्षाच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आज पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथे दुपारी भव्य दिव्य जाहीर सभा संपन्न झाली. या सभेत विविध नेत्यांसह कार्यकर्ते आणि मतदार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

त्यांनी यावेळी पंकजाताई मुंडे यांना मोठ्या मताधिक्याने विजय करू असा विश्वास देत प्रचंड घोषणा आणि टाळ्यांच्या गजरात त्यांना विश्वास दिला.बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे साहेब यांच्या समवेत यावेळी आमदार बाळासाहेब आजबे काका, ज्येष्ठ कार्यकर्ते अजय दादा धोंडे, सतीश आबा शिंदे, विजय गोल्हार, विजयसिंह बांगर, , सुवर्णाताई लांबरूड, महादेव दादा पवार यांच्यासह वरिष्ठ नेते कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी प्रारंभी आल्यानंतर या गावचे ग्रामदैवत खंडेश्वर देवस्थान येथे दर्शन घेण्यात आले. मोठ्या घोषणांनी कार्यकर्त्यांनी परिसरात दनानून सोडला.

दरम्यान,पंकजाताई मुंडे याच खऱ्या अर्थाने जिल्ह्याचा विकास करू शकतात हा विश्वास व्यक्त करत कार्यकर्ते मतदार बांधवांनी त्यांना निवडून देण्याचा निर्धार केल्याचे दिसून आले. या भागात विविध ठिकाणी मोठ्या प्रतिसादात पंकजाताई मुंडे यांच्या सभा आणि धावता दौरा संपन्न झाला. यावेळी शिवनाथ आण्णा पवार, किसनराव पवार, डॉक्टर उमाकांत चौधरी, महादेव दादा पवार, दत्तात्रय पवार, आबासाहेब पवार, मंगेश पवार, रवी पवार, नितीन पवार, संतोष भालेराव, वैभव सांगळे, नवनाथ (एलआयसी) पवार, नितीन पवार, संजय पवार, कृष्णा गंडाळ, अशोक पवार सर, राजेआण्णा पवार आदी सह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# चर्मकार समाज कोणत्याही पक्षाच्या दावणीला समाजातील स्वघोषित नेत्यांनी बांधू नये

## भाजप ला पाठींबा देण्यासाठी आयोजित माजलगाव येथील सकल चर्मकार मेळाव्यास आमचा पाठिंबा नाही - तुळशीराम वाघमारे

गेवराई ।प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजलगाव येथे ५ एप्रिल रोजी सकल चर्मकार समाजाचा मेळावा आयोजित करून जिल्ह्यातील चर्मकार समाज आमच्या पाठीशी असल्याचे दाखवत भाजप नेत्या पंकजाताई मुंडे यांना पाठिंबा जाहीर करण्याचा कार्यक्रम होत आहे त्याला आम्ही चर्मकार म्हणून नाकारतो आहोत.माजलगाव येथील ज्या चर्मकार समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी मेळवा घेवून जिल्ह्यातील चर्मकार समाज भाजप पक्षाच्या दावणीला बांधण्याचे काम केले ते अत्यंत चुकीचे असून जिल्ह्यातील समाज बांधव हा कोणत्याही समाज नेत्याची जहागिरी नाही त्यामुळे झालेला मेळावा हा चर्मकार समाजाला मान्य नसून जिल्ह्यातील चर्मकार समाजाला ग्राह्य धरून नये आणि समाजातील नेत्यांनी मेळावा घेवून समाज विकू नये नसता



समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागेल आणि याचे परिमाण भोगावे लागतील असा इशारा संत रविदास प्रतिष्ठान चे संस्थापक तुळशीराम वाघमारे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये दिला आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चर्मकार समाजातील काही निवडक ज्यांना समाजाच्या जीवावर आपला स्वार्थ पना आणि स्वतःची पोळी कशी भाजेल असे वाटते ते समाजातील समाज विघातक समाजाला स्वतःची जहागिरी समजून कोण्या एका पक्षांच्या दावणीला समाज बांधण्याचे काम करत आहेत परंतु त्यांनी पूर्ण समजला ग्राह्य धरून कोणत्याच पक्षाला आपल्या माघे समाज आहे असे दाखवून स्वतःचा स्वार्थ साधू नये,जर कोण्या पक्षाला अथवा नेत्याला पाठिंबा द्यायचा असेल तर तो वैयक्तिक द्यावा,समाज मेळावे घेवून त्यांना प्रलोभने दाखवून देवू नये, समाज हुशार आणि सुज्ञ आहे,समाज बांधवांनी सदविवेक बुध्दीने सजग राहून आपला निर्णय स्वतः घ्यायचा आहे. समाज माझ्या पाठीशी आहे असे दाखवून नेत्याच्या पुढे लोटांगण घालण्याचा प्रकार सद्या होत आहे ही बाब अत्यंत चुकीची असून ,ज्यां समाजाला आज पर्यंत कोणत्याही प्रवाहात घेतले नाही,अनेक गोष्टींपासून वंचित ठेवले अशा नेत्यांच्या पायघड्या घालण्याची वेळ समाजातील स्वतःला पुढारी समजणाऱ्या कडून होत आहे.त्यामुळे समाजाने सारासार विचार करून आपले मत आणि आपला निर्णय घ्यायची वेळ आली आहे जिल्ह्यातील समाज कोणीही स्वतःची जहागिरी समजू नये आणि नेत्यांच्या मागे पुढे फिरून समाज बांधवांचा स्वाभिमान गहाण ठेवू नये नसता समाज माफ करणार नाही ,नेत्यांनी ही समाजातील विघातक लोकांपासून दूर रहावे. संविधानाने समाज बांधवांना स्वातंत्र्य देवून आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी अधिकार दिले आहेत,संविधानाने दिलेल्या अधिकाराच्या चौकटीत राहून समाज बांधवांनी आपले हकक आणि कर्तव्य बजावून लोकशाही बळकट करण्यासाठी आपले मत आपल्या स्व इच्छेने करावे असे आवाहन संत रविदास प्रतिष्ठान चे संस्थापक तुळशीराम वाघमारे यांनी बीड जिल्ह्यातील समाज बांधवांना केले आहे.




# नेताजी सुभाष माध्यमिक विद्यालय मानवत चा वर्ग दहावी बॅच २००२ स्नेह मिलन सोहळा संपन्न

मानवत ।प्रतिनिधी

येथील वैभवशाली इतिहास असलेल्या नेताजी सुभाष माध्यमिक विद्यालय मानवतच्या वर्ग दहावी २००२ च्या बॅचचा स्नेहमीलन सोहळा अतिशय दिमाखात रेणुका मंगल कार्यालय या ठिकाणी दिनांक ३ व ४ मे २०२४ या दिवशी साजरा झाला. या कार्यक्रमासाठी एकूण १०२ मुले व मुली उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमानिमित्त गुरु पूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमासाठी शाळेचे माजी मुख्याध्यापक श्री सिखवाल सर, श्री भराडिया सर, श्री नेवरेकर सर, श्री येलमटे सर, श्री काकडे सर, श्री केशव शिंदे सर, श्री मोरे सर, श्री पुरी सर, श्री कुलकर्णी सर, श्री अशोक काळे सर, श्री गोविंद सीखवाल सर, श्री थोंबाळ सर, श्री मुंदडा सर, श्री हारकाळ सर उपस्थित होते. या कार्यक्रमानिमित्त सर्व विद्यार्थ्यांचा अल्पपरिचय व सर्व शिक्षकांचा गुरु पूजनाचा कार्यक्रम साजरा झाला या स्नेह मिलनासाठी सर्व संयोजन समितीने यशस्वीपणे कामकाज पार पाडले.

# बंजारा समाजाच्या हितासाठी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात पंकजाताई यांना पाठिंबा!

## समाज हिताच्या विरोधात आपली भूमिका कधीही राहणार नाही-रविकांत राठोड
## समाजाने अफवावर विश्वास ठेवू नये सर्व समाज पंकजाताई यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार-रविकांत राठोड
## बीड येथे आयोजित पत्रकार परिषदेत रविकांत राठोड यांनी सर्व आरोप फेटाळून लावले!

बीड ।प्रतिनिधी

बंजारा समाजाचे युवा नेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी प्रदेश सरचिटणीस रविकांत राठोड यांनी लोकसभा निवडणुकांत माघार घेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार यांच्या गटात जाहीर प्रवेश करत पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना बिनशर्त पाठिंबा देत लोकसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे. यामुळे त्यांच्यावर विरोधकाकडून बिन बुडाचे आरोप होत असून समनक जनता पक्षातून हकालपट्टी केली असल्याची चर्चा समाज माध्यमातून होताना दिसत आहे. त्या पक्षाचे प्राथमिक सदस्य नसताना तो पक्ष हकालपट्टी कसा करू शकतो असा सवाल उपस्थित करत बंजारा समाजाच्या हितासाठी आपण पंकजाताई मुंडे यांना बिनशर्त पाठिंबा दिला असून पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटात सक्रियपणे काम करणार असल्याचे बंजारा समाजाचे नेते व नवनिर्वाचित राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व्ही.जे.एन.टी सेलचे राज्यप्रमुख रविकांत राठोड यांनी बीड येथे हॉटेल नीलकमल येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.बंजारा समाजासाठी पोहरादेवी गड सर्वात महत्त्वाचा मानला जातो या गडामधून आलेला आदेश समाज बांधव कधीही नाकारू शकत नाही. एकीकडे बंजारा समाजाने आपली भूमिका ठरवली आहे. राज्यातील बंजारा समाज हा महायुतीकडे वळलेला आहे. बीडमध्ये ही स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या पाठीशी बंजारा समाज खंबीरपणे उभा होता. खासदार प्रीतम ताई मुंडे यांनाही बंजारा समाजाने साथ दिली होती. या ही लोकसभा निवडणुकीत पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या पाठीशी बंजारा समाज एकजुटीने उभा राहिला आहे. आपण वेगळी भूमिका मांडली होती लोकसभेत आपण अपक्ष उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला. समाज हितासाठी व गडावरील आलेला आदेश आपण टाळू शकत नव्हतो. समाज एकीकडे व आपण एकीकडे यामुळे समाजाचे प्रचंड नुकसान झाले असते यामुळे आपण लोकसभा निवडणुकीतून माघार घेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटात प्रवेश केला.

पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना आपण पाठिंबा दिलेला आहे. कोणत्याही आमिषाला बळी न पडता समाज हितासाठी आपण पंकजा मुंडे यांना बिनशर्त पाठिंबा दिला असून समाज माध्यमातून उठवलेल्या अफवावर विश्वास न करता बंजारा समाजाने एकजुटीने पंकजा मुंडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन या पत्रकार परिषदेमध्ये रविकांत राठोड यांनी केले आहे.

# गढूळ राजकारणात विकासाची त्रुटी फिरवा...!

## विकासाच्या स्वप्नपूर्तीसाठी पंकजाताईंनाच मतदान करा

बीड /प्रतिनिधी

देशाला कणखर नेतृत्वाची गरज आहे, भ्रष्टाचार मुक्त कारभार आणि देश सशक्तिकरणासाठी मोदीजींना मत द्यावेच लागेल, काळाची गरज ओळखून पुन्हा एकदा मोदी सरकार स्थापनेचा संकल्प सर्व सामान्य जनतेने केला. आज सामाजिक आणि राजकीय वातावरण गढूळ असले तरी, आता विकासाची तुरटी फिरवावी लागेल. स्वर्गीय मुंडे साहेबांनंतर पुन्हा एकदा मिळालेली विकासाची सुवर्णसंधी प्राप्त करावी लागणार आहे. देशाचे धोरण आणि जिल्ह्याचा परिपूर्ण विकासाची दिशा ठरवणारी लोकसभेची निवडणूक आहे. संधी न गमावता केवळ विकास डोळ्यासमोर ठेवून भाजपा विचाराच्या झुंजार लोकप्रतिनिधी पंकजाताई मुंडे यांना प्रचंड मताने निवडून द्यावे. असे आवाहन भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी चौसाळा येथील भाजपा प्रचार कार्यालय प्रसंगी केले.

बीड लोकसभा भाजपा महायुतीचे उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ बीड विधानसभा मतदारसंघातील चौसाळा येथील प्रचार कार्यालयाचा शुभारंभ भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादीचे नारायण बप्पा शिंदे, भाजपा जिल्हा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शरद झोडगे, भाजपा दलित आघाडीचे अजय सवाई, माजी सभापती काकासाहेब जोगदंड, पस सदस्य सुनील झोडगे, पवन कुचेकर, सरपंच आप्पासाहेब झोडगे, दीपक काळे, सुंदर लांडगे, शिवाजी शिंदे, शहादेव चौधरी, संतोष तांदळे, भागवत तांदळे, भूषण झोडगे, मोहनराव जोगदंड, बबलू शिंदे, सलीम जहागीर,मिलिंद सोनवणे, कुमार मीटकरी, गणेश काकडे, ज्ञानेश्वर आंधळे, हनू दादा,सुधीर चौधरी साहिल सोनवणे अमोल कांबळे, शहादेव जोगदंड आदी उपस्थित होते.

प्रचार कार्यालयाच्या शुभारंभ नंतर चौसाळा गावात प्रचार फेरी काढण्यात आली. या फेरीस मतदार बांधवांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देऊन मतदान करण्याची ग्वाही दिली.



# पंकजाताई मुंडेंच्या प्रचारार्थ सोमवारी परळी मतदारसंघात धनंजय मुंडेंचा मॅरेथॉन गावभेट दौरा

परळी ।प्रतिनिधी

बीड लोकसभेतील महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचाराची धुरा सांभाळत असलेले धनंजय मुंडे सोमवारी (ता.०६) परळी मतदारसंघात मॅरेथॉन गावभेट दौरा करणार असून, यामध्ये ते विविध गावांमध्ये भेटी देऊन मतदारांशी संवाद साधतील. या दौऱ्यात धनंजय मुंडे सकाळी ८ वा. कौडगाव साबळा येथे हनुमान मंदिरात बैठक घेतील. त्यानंतर कौडगाव घोडा येथे बैठक, कौडगाव हुडा येथे बैठक, ममदापुर येथे बैठक त्यांनंतर सायंकाळी ६ वाजल्यापासून आचार्य टाकळी येथे बैठक, पौळ पिंप्री येथे बैठक, हिवरा-गोवर्धन येथे बैठक असे नियोजन करण्यात आले आहे. धनंजय मुंडे यांच्या प्रचार दौऱ्यात महायुतीतील सर्व घटक पक्षांचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आदी उपस्थित राहतील.



बीड (प्रतिनिधी)

बीड लोकसभा मतदारसंघात इतर जिल्ह्यांचे मतदार जे निवडणुकीच्या कामासाठी या जिल्ह्यात कार्यरत आहेत ज्यांचे मतदान चौथ्या टप्प्यात होणार आहे. तसेच या जिल्ह्याचे पोलीस अधिकारी, कर्मचारी तथा अन्य अधिकारी कर्मचारी जे बीड लोकसभा मतदार संघातील सहा विधानसभा मतदार संघात कर्तव्यावर आहेत अशा एकूण ६२२ मतदारांनी आतापर्यंत पोस्टल मतदानाद्वारे मतदान केले.

निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षणाच्या दुसऱ्या प्रशिक्षण दिवशी प्रशिक्षणाच्या ठिकाणी सुविधा केंद्र उभारण्यात आली असून या ठिकाणी पोस्टल मतदान करता येत आहे. त्यानुसार माजलगाव विधानसभा मतदारसंघात आज ११ आणि काल नऊ असे एकूण २० पोस्टल मतदान झालेले आहेत. बीड विधानसभा मतदारसंघात ३३० पोस्टल मतदान झाले आहे. आष्टी विधानसभा मतदान संघात १२१ पोस्टल मतदान झाले आहे. केज विधानसभा मतदारसंघात १०६ पोस्टल मतदान झाले आहे तर परळी येथील विधानसभा मतदारसंघात ४५ असे एकूण ६२२ पोस्टल मतदान झालेली आहेत, अशी माहिती टपाली मतदान*, सहाय्यक निवडणूक अधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी कळवली आहे.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT